# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर.-416004

**परिपत्रक क्र.कोविमं/शाखा माध्य.परीक्षा/१८३९ /दिनांक 13/10/2018**

विषय:-मार्च-2019 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत.. ..

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मार्च-2019 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेच्या नियमित, पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी श्रेणी सुधार योजना व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने
**www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या किंवा **www.mahasscboard.in**
संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशिल खालीलप्रमाणे:-

| शुल्क प्रकार | माध्य.शाळांनी नियमीत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATABASE वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | माध्य.शाळांनी पुनर्परिक्षार्थी यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजना व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | **वितरण केंद्राकडे** माध्यमिक शाळांनी बँकेत शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या (EXCEL मधील) याद्या व FEE DETAILS जमा करावयाच्या तारखा |
|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 3 | 4 | 5 |
| अ)नियमित शुल्कासह | सोमवार दि.15/10/18 ते सोमवार दि.05/11/18 | मंगळवार दि.06/11/18 ते शुक्रवार दि.16/11/18 | सोमवार दि.26/11/18 ते शनिवार दि.01/12/18 | सोमवार दि.03/12/2018 |
| ब) विलंब शुल्कासह | शनिवार दि.17/11/18 ते शनिवार दि.24/11/18 (सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत) | | | |

अ) माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह **विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख बुधवार दि.05/12/2018 आहे.**

ब) दिनांक 26/11/18 ते 01/12/2018 या कालावधीत माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांच्या याद्या **EXCEL** मध्ये प्रिंट करणे.

परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी त्यांची आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावीत. सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

1. शासन आदेशानुसार माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी **SARAL DATABASE** मध्ये विद्यार्थ्यांची नोंद आवश्यक आहे.व सदर **SARAL DATA** वरुनच नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.
2. पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजना व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती **SARAL DATA** मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे ( कॉलम नं 03 नुसार ) निश्चित करण्यात आल्या आहेत.
3. कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व माध्यमिक शाळांनी शुल्क प्रचलित पध्दतीने बँक ऑफ इंडीयात मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
4. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क **दोन स्वतंत्र चलनाद्वारेच** भरण्यात यावे.
5. शासन आदेशानुसार इ.10 वी च्या व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रचलित असलेल्या व्ही-1, व्ही-2 व व्ही-3 या विषयांऐवजी शैक्षणिक वर्ष 2018-2019 पासून **Multi skill Foundation Course / Introduction to basic technology (81), Mechanical Technology(91), Electrical Technology (92), Electronics Technology (93)** हे विषय नव्याने सुरु करण्यात आलेले आहेत. सदर विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या शुल्काबाबतचा तपशिल व कार्यपध्दती याबाबत आपणांस स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.
6. **आवेदनपत्रांसोबत नियमित/विलंब शुल्क भरल्याशिवाय आपल्या शाळेचा निकाल जाहीर केला जाणार नाही या बाबीची गांभिर्याने नोंद घ्यावी.**

# वितरण केंद्र प्रमुखांना सूचना

वितरण केंद्र प्रतिनिधींनी नियमित व विलंब शुल्कान्वये जमा झालेल्या **EXCEL** मधील विद्यार्थ्यांच्या याद्या, चलने व **FEE DETAILS** इ. बुधवार दिनांक 05/12/2018 रोजी विभागीय मंडळ कार्यालयाकडे जमा करावीत.

**महत्वाची नोंद :-** पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या मागील सर्व परीक्षेच्या गुणपत्रिकेच्या छायांकित प्रती **(XEROX COPIES)** शाळांकडून घेण्यात याव्यात. नियमित विद्यार्थ्यांचे व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे गठ्ठे वेगवेगळे जमा करावेत.

प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति,

1) मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
   सातारा, सांगली व कोल्हापूर.

2) मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) सातारा, सांगली व कोल्हापूर.